सन २०१८-१९ मध्ये शासनाने दुष्काळ जाहिर केलेल्या भागात सुरू केलेल्या जनावरांच्या चारा छावण्यांमधील किमान जनावरांची संख्या शिथील करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.एससीवाय-२०१९/प्र.क्र.३०/म-७,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १ जून, २०१९.

वाचा :- १. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एससीवाय-२०१९/ प्र.क्र.३०/ म-७, दि. २५.१.२०१९.
२. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एससीवाय-२०१९/ प्र.क्र.३०/ म-७, दि. १३.२.२०१९.
३. महसूल व वन विभाग, शासन पत्र, समक्रमांक, दिनांक ०८.०३.२०१९
४. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एससीवाय-२०१९/ प्र.क्र.३०/ म-७, दि. ०४.०५.२०१९.
५. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एससीवाय-२०१९/ प्र.क्र.३०/ म-७, दि. १६.०५.२०१९.

प्रस्तावना -

सन २०१८ च्या खरीप मोसमात राज्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान झालेले असल्याने राज्यातील २६ जिल्ह्यांमधील १५१ तालुक्यात, या १५१ तालुक्यांव्यतिरिक्त २६८महसुली मंडळांमध्ये दुष्काळ तसेच ५४४९ गावांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित केलेली आहे.

२. राज्यात दुष्काळी परिस्थितीमुळे त्या भागातील पशुधनासाठी आवश्यक असणारा चारा व पाणी उपलब्धतेबाबतचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने, दुष्काळग्रस्त भागातील जनावरांना आवश्यक असलेल्या चाऱ्याच्या प्रश्नावर मात करण्यासाठी संदर्भाधीन क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील दुष्काळी भागात आवश्यकतेनुसार जनावरांना चारा व पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी जनावरांच्या छावण्या उघडण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. तसेच संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये काही सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. संदर्भाधीन क्रमांक ३ येथील शासन पत्रान्वये पशुधन अनुदानाचे दर सुधारित करण्यात आले आहेत व दुसरी चारा छावणी उघडण्यास मान्यता देण्याबाबत सुधारित निकष निश्चित करण्यात आले आहेत.

संदर्भाधीन शासन निर्णय क्र. १ अनुसार दुष्काळग्रस्त भागात जनावरांच्या छावण्या सुरू करण्यासाठी अटी व शर्ती विहित करण्यात आल्या आहेत. त्यातील अट /शर्त क्र. २ "**जनावरांची छावणीमध्ये किमान ३०० व कमाल ५०० जनावरे दाखल करून घेण्यात यावीत. मात्र वेळोवेळी परिस्थितीचे अवलोकन करून, व आढावा घेऊन, प्रकरणपरत्वे आवश्यकता असल्यास , छावणीतील जनावरांची संख्या किमान २५० पर्यंत शिथिल करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना राहतील" अशी आहे.** तद्नंतर कमाल जनावरांची संख्या ३००० पर्यंत वाढविण्यात आली आहे. चारा छावणीसाठी किमान २५० जनावरांची अट असली तरीही

गावस्तरावर चारा छावण्या उघडण्यास परवानगी देण्यात आल्यामुळे किमान २५० जनावरांची अट सर्वच ठिकाणी पूर्ण होईल याची खात्री देता येणार नाही. त्यामुळे अशा चारा छावण्यांना अनुदानापासून वंचित रहावे लागेल. त्यामुळे चारा छावणीची किमान २५० जनावरांपर्यंत संख्येची अट आणखी शिथील करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय-

दुष्काळी भागात जनावरांना चारा व पाणी उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने जनावरांची छावणीमध्ये किमान ३०० व कमाल ३००० जनावरे दाखल करून घेण्यात यावीत. मात्र वेळोवेळी परिस्थितीचे अवलोकन करून, व आढावा घेऊन, प्रकरणपरत्वे आवश्यकता असल्यास , छावणीतील जनावरांची संख्या किमान २५० पर्यंत शिथिल करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना देण्यात आले होते. **सदर अट आणखी शिथिल करून छावणीतील जनावरांची संख्या किमान १५० पर्यंत शिथिल करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना देण्यात येत आहेत.**

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०६०११५५०२३४२१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने सांक्षकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2019.06.01 15:57:54 +05'30'

(सु. ह.उमराणीकर)
उपसचिव, महसूल व वन विभाग

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव , मंत्रालय, मुंबई.
३. सर्व विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य
४. मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, (पदुम), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. सचिव, (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे
८. आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे
९. विभागीय आयुक्त (सर्व)
१०. जिल्हाधिकारी (सर्व)
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

१३. प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन (सर्व)

१४. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त (सर्व)

१५. सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (सर्व)

१६. वित्तिय सल्लागार व सहसचिव, मदत व पुनर्वसन, नवीन प्रशासकीय भवन,मुंबई

१७. मा.मंत्री (मदत व पूनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

१८. मा. राज्यमंत्री (मदत व पूनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

१९ . मा.मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२०. मा.राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

२१. मदत व पुनर्वसन विभागातील कार्यासने (म-११)

२२. निवड नस्ती, म-७